नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३३६ Issue - 336 | वार सोमवार दि. २७ एप्रिल २०२६ Blow- Monday Date 27 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## आजच्या जागतिक तणावाच्या काळात बुद्धांचे विचार अधिक महत्त्वाचे : पंतप्रधान नरेंद्र मोदी

### मन की बात कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद; भगवान गौतम बुद्धांचा जीवन संदेश आजही तितकाच प्रासंगिक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : बुद्धांचा संदेश केवळ भूतकाळ नाही, तो आजही प्रासंगिक आहे आणि भविष्यासाठीही आवश्यक आहे. बुद्ध पौर्णिमेची ही संधी आपल्याला प्रेरणा देते. आपण आपल्या जीवनात शांतता वाढवूया, करुणेचा अंगिकार करुया आणि संतुलनासह पुढे जाऊया. आज जग ज्या प्रकारच्या तणावातून आणि संघर्षातून जात आहे, अशा काळात बुद्धांचे विचार अधिकच महत्त्वाचे झाले आहेत, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. त्यांनी 'मन की बात' (१३३ वा भाग) कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला.



ते पुढे म्हणाले की, काही दिवसांतच आपण बुद्ध पौर्णिमा साजरी करणार आहोत. मी तुम्हा सर्व देशवासियांना आधीपासूनच शुभेच्छा देतो. भगवान गौतम बुद्धांचा जीवन संदेश आजही तितकाच प्रासंगिक आहे. शांततेची सुरुवात आपल्या आतूनच सुरू होते, हे त्यांनी आपल्याला शिकवले आहे; स्वतः वर विजय मिळवणे हाच सर्वात मोठा विजय असतो, हे त्यांनी सांगितले आहे. बौद्ध परंपरा आपल्याला निसर्गासोबत नाते निर्माण करण्याची शिकवण देते. भगवान बुद्धांना ज्ञान एका वृक्षाखालीच मिळाले होते. निसर्ग हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. देशामध्येही असे प्रयत्न होत आहेत.

भारताने विज्ञानाला नेहमीच देशाच्या प्रगतीशी जोडले आहे. याच विचाराने आपले शास्त्रज्ञ 'नागरी अणू कार्यक्रम' पुढे नेत आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे हा कार्यक्रम राष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान देत आहे. यामुळे आपल्या औद्योगिक विकासाला, ऊर्जा क्षेत्राला आणि आरोग्य क्षेत्राला मोठा लाभ झाला आहे. शेतीपासून ते आधुनिक नवसंशोधकांपर्यंत सर्वांनाच भारताच्या नागरी अणू कार्यकर्माने मोठी मदत केली आहे.

भारताच्या विकासासाठी सौर आणि पवन ऊर्जा आवश्यक आहेत. ही केवळ पर्यावरणाची बाब नाही, तर ही आपल्या भविष्याची सुरक्षा आहे. यामध्ये आपल्या सर्वांची भूमिका आहे. आपल्याला वीज वाचवायची आहे, आपल्याला स्वच्छ ऊर्जा म्हणजेच लश्नशरप शपशीसू चा स्वीकार करायचा आहे. देशामध्ये प्रत्येक स्तरावर असे प्रयत्न होणे गरजेचे आहे, कारण यातूनच मोठा बदल घडून येतो.

आज भारत पवन-ऊर्जा क्षमतेमध्ये जगात चौथ्या स्थानावर आहे. आपल्या अभियंत्यांचे हे कष्ट आहेत, हे आपल्या तरुणांचे परिश्रम आहेत आणि हे देशाच्या सामूहिक इच्छाशक्तीचे प्रतीक आहे. आज पवन-शक्ती भारताच्या विकासाची नवीन गाथा लिहित आहे. भारताने अलीकडेच पवन-ऊर्जा म्हणजेच थळपव एपशीसू मध्ये मोठे यश संपादन केले आहे. आता भारताची पवन-ऊर्जा निर्मिती क्षमता ५६ गिगावॉट पेक्षा अधिक झाली आहे. गेल्या केवळ एका वर्षातच सुमारे सहा गिगावॉट नवीन क्षमतेची भर पडली आहे. पवन-ऊर्जेमध्ये भारत झपाट्याने पुढे जात आहे आणि जगही आपल्याकडे मोठ्या आशेने पाहत आहे.

## शिवरायांबद्दल वादग्रस्त वक्तव्य, राज्यभरात संताप, अखेर बागेश्वर बाबांचा माफीनामा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी बागेश्वर धामचे पीठासीन बागेश्वर बाबा उर्फ धीरेंद्र शास्त्र हे वादात सापडले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे युद्ध लढून थकले आणि त्यांनी आपलं मुकूट रामदास स्वामी यांच्याजवळ ठेवलं. आपण आता थकलो असून हा राजपाट सांभाळा, असं शिवाजी महाराज रामदास स्वामींना म्हणाले. त्यावर रामदास स्वामी यांनी गुरु कोण आणि शिष्ट कोण? असा प्रश्न विचारला. त्यावर शिवाजी महाराजांनी आपण गुरु आणि मी शिष्य असल्याचं रामदास स्वामींना म्हटलं. यानंतर रामदास स्वामी यांनी आतापासून हे राज्य आपलं असून तुम्ही या राज्याचा कार्यभार सांभाळावा असा मी आदेश देतो, असं रामदास स्वामी शिवाजी महाराजांना म्हणाले, असं वादग्रस्त वक्तव्य बागेश्वर बाबा यांनी नागपुरात कार्यक्रमात केलं होतं. त्यांच्या या वक्तव्यावरुन राज्यभरात संतापाची लाट पसरली होती. त्यामुले अखेर आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण देत बागेश्वर बाबा यांनी माफी मागितली आहे.

मी परवा नागपुरात आलो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भारत दुर्गामाता मंदिराच्या भूमीपूजनाच्या कार्यक्रमाला जाण्याचं भाग्य आम्हाला मिळालं. सोशल मीडियावर कालपासून काही लोकांनी आमच्या वक्तृयाला वेगळ्या पद्धतीने दाखवलं. ज्यांना वाचून आणि ज्यांना जाणून आम्ही या भूमीवर आलो, ज्यांच्या स्वराज्य स्थापनेचा विचार वाचून आम्ही हिंदूराष्ट्राचा संकल्प केला. आम्हाला दोष देण्यात आला की, आम्ही त्यांचा अवमान केला. यामुळे आमच्या मनात खूप दु:ख आणि खेद आहे, अशी भावना बागेश्वर बाबांनी व्यक्त केली.

ज्यांची हिंदवी स्वराज्याची स्थापना वाचून मी हिंदूराष्ट्राचा संकल्प केला, आम्ही त्यांचा अपमान करणं ही तर फार दूरची गोष्ट आहे, कुणी स्वप्नातही त्यांची निंदा करतील तर आम्ही ऐकून घेऊ शकणार नाहीत. आम्हीच काय तर या देशाचा प्रत्येक सनातनी आज जिवंत आहे, हिंदूत्वासाठी तो सजग आहे तर त्याचे श्रेय छत्रपती शिवाजी महाराजांचं आहे, असं ते म्हणाले.

आम्हाला दु:ख आहे की, जे छत्रपती शिवाजी महाराजांना ऐकतात मग ते छत्रपती संभाजी महाराज ब्रिगेडचे लोकं असतील किंवा मराठा साम्राज्यात जीवन जगणारे मराठे असतील, ते आमचेच लोक आहेत. आम्ही सर्व शिवाजी महाराजांचे लोक आहोत. आम्ही आपापसात वाद घालू तर दुसऱ्यांना त्याचा फायदा होईल. आमचा एक टक्केदेखील तसा विचार नव्हता. शिवाजी महाराज गुरुमहिमाप्रती समर्पित होते ते सांगण्याचा उद्देश होता, असं बागेश्वर बाबांनी स्पष्ट केलं.

आमच्या देशचे राजा, आमच्या देशाचे हिंदूहृदयसम्राट, हिंदूंचे सम्राट छत्रपती वीर शिवाजी महाराज संत, महंत, आई तुळजाभवानीला किती मानायचे ते



मला सांगायचं होतं. ती भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न मी माझ्या भाषेतून सांगत होतो. या भाषेच्या अर्थाचा अनर्थ करुन काही लोकांनी चुकीच्या पद्धतीने दाखवलं. माझ्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आला. कुणाला माझ्या वक्तव्याने त्रास झाला असेल किंवा कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर मनापासून माफी मागतो, अशा शब्दांत बागेश्वर बाबा यांनी माफी मागितली. पण एक गोष्ट आहे, आमच्या म्हणण्याला चुकीच्या पद्धतीने दाखवलं जाऊ नये. कारण मी आम्ही शिवाजी महाराजांसाठी जगतो आणि मरतो देखील शिवाजी महाराजांसाठी. आमचे जीवनही त्यांच्या स्वराज्यासाठी आहे. हिंदूराष्ट्रची कल्पना आणि विचारधारा ही त्यांच्यापासूनच घेतली आहे. मग मी त्यांची शब्दांतून अवहेलना कशी करु शकतो?, अशी भूमिका बागेश्वर बाबांनी मांडली.

## डिनर प्रोग्राममधील गोळीबारात इराणचा हात? डोनाल्ड ट्रम्प यांचा मोठा खुलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : वॉशिंग्टन डीसी येथे 'व्हाईट हाऊस कॉरस्पॉन्डंट्स असोसिएशन'च्या डिनर कार्यक्रमात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपस्थितीत झालेल्या गोळीबाराच्या घटनेने जगभरात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर ट्रम्प यांनी तातडीने पत्रकार परिषद घेऊन सुरक्षा यंत्रणांची माहिती दिली. विशेषतः इराणसोबत सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा हल्ला इराणने घडवून आणला का? असा प्रश्न विचारला असता ट्रम्प यांनी सध्यातरी अशी कोणतीही शक्यता नसल्याचे स्पष्ट केले.



पत्रकारांनी जेव्हा ट्रम्प यांना विचारले की, या हल्ल्याचा इराणशी काही संबंध आहे का? तेव्हा ट्रम्प म्हणाले, सुरुवातीच्या माहितीनुसार तसे दिसत नाही. हा हल्ला एखाद्या मोठ्या आंतरराष्ट्रीय कटाचा भाग वाटत नसून, एका माथेफिरू व्यक्तीने केलेले हे कृत्य असावे. तो एकटाच काम करत होता, असे संकेत मिळत आहेत. सखोल तपासानंतरच पूर्ण सत्य समोर येईल.

ट्रम्प यांनी माहिती दिली की, हल्लेखोर हा कॅलिफोर्नियाचा रहिवासी आहे. त्याने अनेक शस्त्रास्त्रांसह सुरक्षा चौकीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, 'सीक्रेट सर्व्हिस'च्या जवानांनी जीवाची बाजी लावून त्याला रोखले. सुरक्षा दलांच्या तत्परतेमुळे मोठी जीवितहानी टळली. एका सुरक्षा अधिकाऱ्याला गोळी लागली आहे, पण बुलेटप्रूफ जॅकेटमुळे तो सुरक्षित आहे, असेही ट्रम्प यांनी नमूद केले.

गोळीबारानंतर इनडोअर (बंदिस्त) कार्यक्रमांच्या सुरक्षिततेबद्दल प्रश्न विचारले असता, ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, ते अशा भीतीपोटी आपले कार्यक्रम किंवा कार्यपद्धती बदलणार नाहीत. ज्या हॉलमध्ये हा कार्यक्रम होता, तो पूर्णपणे सुरक्षित होता. हल्ला माझ्यावरच करण्याचा प्रयत्न असू शकतो, मात्र आम्ही हिंसेला घाबरणार नाही, असे धाडसी विधान त्यांनी केले.

या घटनेत नेमकं काय घडलं आणि सुरक्षा यंत्रणांनी कशी कारवाई केली, हे जनतेला समजावे यासाठी ट्रम्प यांनी या घटनेचा व्हिडिओ जारी करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, देशातील जनतेला शांतता राखण्याचे आवाहन करत त्यांनी मतभेद हिंसेने नाही तर शांततेने सोडवले पाहिजेत, असा संदेश दिला.

### घाटातील अपघात आणि विलंबाला कायमचा ब्रेक; वेगवान आणि सुरक्षित प्रवासाने अर्थव्यवस्थेला मिळणार गती

## मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवरील घाटाला मिळणार बायपास; 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे १ मेला उद्‌घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवीन टोलवाढ नाही, चारचाकी आणि बसेस मधून होणाऱ्या प्रवासी वाहतुकीला परवानगी

मुंबई : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः 'ऍक्सेस कंट्रोल' बनवणाऱ्या महत्त्वाच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. मी स्वतः येथे येऊन कामाची गुणवत्ता तपासली असून काम समाधानकारक झाले आहे. उर्वरित किरकोळ कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होतील. वेळेत आणि उच्च दर्जाने काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत, असे त्यांनी सांगितले.

सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेल्याचे शिंदे यांनी नमूद केले.



मिसिंग लिंक सुरू झाल्यानंतर घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक पूर्णपणे बायपास होणार असून प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होईल. या प्रकल्पामुळे घाटातील अपघात जवळपास शून्यावर येतील, असा ठाम दावा शिंदे यांनी केला. यामुळे इंधनाची बचत, वेळेची बचत आणि प्रदूषणात लक्षणीय घट होणार आहे.

या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात बस आणि हलक्या वाहनांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल.

टोलवाढीबाबत स्पष्ट करताना शिंदे म्हणाले की, मिसिंग लिंक प्रकल्पामुळे टोलमध्ये कोणतीही वाढ होणार नाही. खालापूर टोल नाक्यावरही सध्या कोणतीही वाढ प्रस्तावित नाही.

सुमारे ६७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला २०१९ साली मंजुरी देण्यात आली होती. त्या वेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते, तर आता त्यांच्या उपस्थितीतच या प्रकल्पाचे लोकार्पण होणार असल्याने हा एक विशेष योगायोग असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा देशातील पहिला क्सेस कंट्रोल मार्ग ठरला होता. या मार्गामुळे आयटी, सेवा क्षेत्र, उद्योग आणि रिअल इस्टेटमध्ये मोठी वाढ झाली. आता मिसिंग लिंक प्रकल्पामुळे या मार्गाची कार्यक्षमता आणखी वाढणार आहे.

तसेच या प्रकल्पामुळे लोहगड, विसापूर किल्ले आणि कार्ला लेणी यांसारख्या पर्यटन स्थळांना अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळणार असून पर्यटनालाही चालना मिळेल. यासाठीच या प्रकल्पातील बोगद्यांना देखील गडकिल्ले आणि कार्ला लेण्याच्या प्रतीकृतीप्रमाणे सजवण्यात आले असल्याचे शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले. कामाचा दर्जा उत्तम ठेवून ही शिल्प खराब होऊ नयेत याची पुरेशी खबरदारी घेण्यात आली असल्याचे यावेळी शिंदे यांनी स्पष्ट केले.

अशा प्रकारचे प्रकल्प हे केवळ रस्ते नसून राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती देणारे असतात. कनेक्टिव्हिटी मजबूत असेल तर उद्योग, आयटी, सेवा क्षेत्र आणि रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढतात, असे शिंदे यांनी सांगितले.

पुढील काळात समृद्धी महामार्ग, कोकण कोस्टल रोड, वसई-विरार मल्टीमोडल कॉरिडॉर यांसारख्या प्रकल्पांना जोडून राज्यात ऍक्सेस कंट्रोल रस्त्यांचे जाळे उभारण्यावर सरकारचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रातील कोणत्याही कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यात ७ ते ८ तासांत पोहोचता येईल, अशी सक्षम दळणवळण व्यवस्था उभारत आहोत, असे त्यांनी सांगितले.

मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई आणि पुणे यांच्यातील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार असून हा प्रकल्प राज्याच्या विकासाला गती देणारा ठरणार असल्याचा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, माजी नगरसेवक आबासाहेब बागुल, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड आणि एमएसआरडीसी, एफ्कॉन आणि नवयुग कंपनीचे सर्व प्रमुख अभियंते आणि कर्मचारी उपस्थित होते.

## संपादकीय....

# अर्थव्यवस्थेला गती

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः 'ऍक्सेस कंट्रोल' बनवणाऱ्या महत्त्वाच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेले आहे. मिसिंग लिंक सुरू झाल्यानंतर घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक पूर्णपणे बायपास होणार असून प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होईल. या प्रकल्पामुळे घाटातील अपघात जवळपास शून्यावर येतील, असा ठाम दावा शिंदे यांनी केला. यामुळे इंधनाची बचत, वेळेची बचत आणि प्रदूषणात लक्षणीय घट होणार आहे. या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात बस आणि हलक्या वाहनांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. टोलवाढीबाबत स्पष्ट करताना शिंदे म्हणाले की, मिसिंग लिंक प्रकल्पामुळे टोलमध्ये कोणतीही वाढ होणार नाही. खालापूर टोल नाक्यावरही सध्या कोणतीही वाढ प्रस्तावित नाही. सुमारे ६७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला २०१९ साली मंजुरी देण्यात आली होती. त्या वेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते, तर आता त्यांच्या उपस्थितीतच या प्रकल्पाचे लोकार्पण होणार असल्याने हा एक विशेष योगायोग आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा देशातील पहिला क्सेस कंट्रोल मार्ग ठरला होता. या मार्गामुळे आयटी, सेवा क्षेत्र, उद्योग आणि रिअल इस्टेटमध्ये मोठी वाढ झाली. आता मिसिंग लिंक प्रकल्पामुळे या मार्गाची कार्यक्षमता आणखी वाढणार आहे.

# जागतिक हिवताप दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : सहाय्यक संचालक (हिवताप) व जिल्हा हिवताप कार्यालय तसेच नागरी आरोग्य केंद्र, राजारामपुरी, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक हिवताप दिन राजारामपुरी येथील नागरी आरोग्य केंद्र येथे संपन्न झाला .

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा हिवताप कार्यालय येथे डॉ. सर रोनाल्ड रॉस यांच्या प्रतिमेला राजाध्यक्ष कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.अतिरिक्त जिल्हा हिवताप अधिकारी जे.के. कांबळे यांनी हिवताप दिनाचे महत्त्व सांगून सर रोनाल्ड रॉस यांच्या कार्याबद्दल माहिती दिली. याप्रसंगी नगरसेविका प्रतिज्ञा उत्तुरे, धनश्री कोरवी, सामाजिक कार्यकर्ते महेश कोरवी, डॉ. पवार, डॉ अमोल माने, डॉ. संदेश कांबळे, जे. के. कांबळे, डॉ. योगिनी कुलकर्णी उपस्थित होते.


तत्पूर्वी आशा स्वयंसेविका यांनी डासांपासून होणारे आजार याविषयी पथनाट्य सादर करून जनजागृती केली.

या कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त आरोग्य निरीक्षक एस पी यादव, झोनल एंटमोलॉजीस सतीश सावंत, आरोग्य निरीक्षक अशोक थैल, किटक समाहरक सतीश ढेकळे, प्रणव जाधव, संजय पाटील, शंकर कुंभार, आरोग्य सेवक जावेद मुल्ला, ऋषिकेश परुळेकर, राहुल डोंगळे, संबंधित विभागाचे वैद्यकीय अधिकारी तसेच आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका शासकीय मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी व भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन डॉ.अमोल माने तर आभार डॉ. योगीनी कुलकर्णी यांनी मानले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांना दिले स्वतंत्र जगण्याचे अधिकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



भारतीय समाजात 'जातीयता, अस्पृश्यता, अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी प्रथा, परंपरा, व्रतवैकल्य' इत्यादी, वाईट-अनिष्ठ चालीरिती अस्तित्वात होत्या. वर्णव्यवस्थेने एका विशिष्ट प्रवर्गालाच शिक्षणाचा हक्क बहाल केला होता. तर इतरांना त्यांची सेवा करावी अशी कामाची जातीनिहाय विभागणी करुन दिली होती. वर्णव्यवस्थेच्या चौकटी बाहेर जाण्याची मुभा नव्हती, त्यामुळे भारतीय समाजाची अधोगती झाली. प्राचिन काळापासून आधुनिक युगापर्यंत शुद्र आणि स्त्रियांना हालखीचे जीवन जगावे लागले. इंग्रजांच्या आगमनाने भारतीय समाजात सकारात्मक बदल पहावयास मिळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ह्या बाबी बालवयापासून भारतीय समाजातील तीव्र समस्या जवळून अनुभवलेल्या आहेत. शिक्षण घेत असतांना अस्पृश्य म्हणून मिळालेली वागणुक त्यांना सयाजीराव गायकवाड यांच्या राजदरबारातही नौकरी करतांना मिळत होती, उच्च विद्याविभुषित माणसाला एवढी हिन वागणूक मिळत होती. तर ती अज्ञानी माणसाला किती अन्यायकारक असेल. या संदर्भात बाबासाहेबांनी चिंतन, मनन केले होते. जगाचे ज्ञान असलेल्या आंबेडकरांना भारतीय स्त्रियांबद्दल काही तरी करण्याची जिद्द होती. हे त्यांच्या प्रत्यक्ष कृतीतून स्पष्ट दिसुन येत आहे.

'केवळ चुल आणि मुल' ही भारतीय समाज व्यवस्थेची विचारधारा विज्ञानवादी डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हती. कारण भारतात वर्णव्यवस्था शुद्र, अतिशुद्र आणि स्त्रियावरील बंधने लादणे आणि हिंदू-धर्म शास्त्राप्रमाणे स्त्रीयांना गुलामीचे जिवन जगावे लागले. समाजात जिवन जगतांना समान न्याय, समान वागणुक मिळाली, तर समाजाचा पर्यायाने देशाचा विकास होईल ही डॉ. आंबेडकर यांची धारणा होती. म्हणून त्यांनी हिंदू धर्मातील 'अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा' यावर घणाघाती हल्ले चढविले आणि त्यामुळे डॉ. आंबेडकर हिंदू विरोधी म्हणून प्रतिगामी कट्टरवाद्यांनी बाबासाहेब केवळ अस्पृश्य समाजातील आहेत असे म्हणून त्यांची अवहेलना केली. डॉ. आंबेडकरांच्या स्त्रीविषयक कार्याचा आढावा घेताना असे दिसून येते की, बाबासाहेब म्हणतात. कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे. यावरुन करता येते समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. अशी त्यांची अग्रही भूमिका होती. प्रगती केवळ पुरुषांचीच नव्हे तर स्त्रियांची देखील होणे गरजेचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजुरमंत्री असतांना 'खान कामगार स्त्रिला प्रस्तुती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरुषाइतकीच मजुरी, २१ दिवसांची किरकोळ रजा, एका महिण्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास, नुकसान भरपाई आणि वीस वर्षाची सेवा' झाल्यावर निवृत्ती वेतनाची तरतुद यासारख्या महत्वाच्या निर्णयाचा उल्लेख करावाच लागतो. 'कामगार किंवा नोकरी करणाऱ्या स्त्रिला प्रस्तुती रजा मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील पहिले व्यक्ती आहेत. भारतानंतरच अनेक वर्षांनी इतर देशातील महिलांना प्रस्तुती रजा मंजूर झाल्या आहेत. स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांच्या हक्कासंबंधी, हिंदू कोडबीलासंबंधीत मसुदा २८ फब्रुवारी १९४८ रोजी संसदेत मांडला गेला. भारतातील सर्व जाती-धर्मातील स्त्रियांची जाचक रुढी आणि परंपरापासून सुटका मिळावी यासाठी हा मसुदा लिहला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ४ वर्षे, १ महिना आणि २६ दिवस काम करून 'हिंदू कोडबील' तयार केले. डॉ. आंबेडकर एक प्रख्यात वकिल होते. स्वतंत्र भारताचे कायदे मंत्री म्हणून त्यांनी हिंदू कोडबीलावर सुमारे ४ वर्षे काम केले. जाती व्यवस्थेत स्त्रियांना कमी लेखले जात आहे म्हणून त्यासाठी हिंदू कोडबिल बनविने डॉ. आंबेडकरांना गरजेचे वाटले असावे. ज्यामुळे देशातील सर्व स्त्रियांना समान अधिकार प्राप्त झाले.

सर्व जाती धर्माच्या स्त्रियांना समान न्याय हक्क मिळावा अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. भारतीय समाजातील स्त्रीयांना समान हक्कासाठी त्यांनी १९४८ मध्ये संविधान सभेत हिंदू कोड बिल चा मसुदा प्रस्तुत केला होता. बाबासाहेब आंबेडकर असे समाज सुधारक आहेत की, ज्यांच्या अध्ययनातुन, कृतीतुन समाज सुधारणेचा एकही घटक वगळता आला नाही असे वाटते. स्वतंत्र भारताचे 'कायदा मंत्री, घटनाकर्ते. अर्थतज्ञ. प्रख्यात वकिल, इतिहासकार' अशा अनेक क्षेत्रात दैदिप्यमान किर्ती करणारे केवळ एकच महामानव, महापुरूष आहेत. म्हणून या अष्टपैलु व्यक्तीमत्वाचे अनंत पैलु तर आहेतच परंतु संसदेत स्त्रियांच्या हक्कासाठी अहोरात्र मेहनत करून एक क्रांतीकारी 'हिंदू कोडबिल' मांडणारे बाबासाहेब होत. त्याला संमती मिळाली नाही म्हणून आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा देणारे व्यक्तीमत्वाचे उदाहरण जगाच्या इतिहासात दुर्मिळ आहे असे म्हणणे सार्थकी लागेल, 'हिंदू कोडबिल' असेल किंवा मजुर मंत्री असतांना कामगार स्त्रियांच्या हिताचे निर्णय घेणारे बाबासाहेब घटनेमध्ये 'शोषीत, पिडीत, वंचित, दुबळे, दलित स्त्रिया, शेतकरी' इत्यादी उपेक्षित घटकांना राज्यघटनेमध्ये सामाजिक न्याय देतांना दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक कर्ते समाज सुधारक' म्हणून आपली भूमिका बजावतांना दिसतात.

भारतीय समाज व्यवस्थेत पुरुषसत्ताक संस्कृती असल्यामुळे कुटूंब संस्थेत स्त्रियांचे स्थान दुय्यम दर्जाचे राहिले आहे. समाजातील वाईट चालिरीती. प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा ह्या अवितरपणे चालत राहिल्या आहेत. सनातनवाद्यांनी स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नाकारल्याने अज्ञानी स्त्रीयांना आपल्या स्वातंत्राची व हक्काची जाणीव होण्यास विसावे शतक उजाडले आहे. इंग्रजाच्या आगमनाने भारतातही समाज प्रबोधनाला प्रारंभ झाला समाजसुधारकांनी स्त्रियांना स्वातंत्र्य, समता, बंधुता मिळावी यासाठी प्रयत्न केले. 'राजाराम मोहन रॉय, महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा जोतिराव फुले' यासारख्या समाज सुधारकांच्या परंपरा निर्माण झाल्या. त्याच परंपरेतील कर्ते समाज सुधारक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अनन्य साधारण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांसाठी सभा घेतल्या, त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली. संसदेत स्त्रियांसाठी हिंदू कोडबील मांडले, कामगार स्त्रिया, गृहीणी या सर्व भारतीय महिलांच्या उन्नतीसाठी त्यांनी सर्वोतोपरी प्रयत्न केलेले दिसुन येतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याच्या माध्यमातून स्त्री उन्नतीसाठी जे कार्य केले. ते ऐतिहासिक दृष्टया महत्वपूर्ण ठरले आहे. भारतीय स्त्रीवर लादलेली हजारो वर्षापासुनची आर्थिक, सामाजिक, धार्मिक गुलामगीरी कायद्याच्या माध्यमातुन नष्ट करण्यात आली. स्त्री-पुरुष यांच्यातील भेद नष्ट करुन समानतेचा अधिकार प्रधान करण्यात आला. कामगार स्त्रीयांच्या वेतनाच्या संदर्भात हितसंवर्धनाचा मसुदा तयार केला. हे सर्व कार्य त्यांनी स्त्रीयांना उच्चपदस्थ करण्यासाठी केले. राज्यघटनेत स्त्रीविषयक कायद्याचा समावेश करण्याचा प्रयत्न बाबासाहेबांनी केला. केंद्रीय मंत्रीमंडळात मजुर मंत्री पदावर असतांना गिरण्या, कारखाने इत्यादी ठिकाणी कामे करणाऱ्या कामगार स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने वेतन मिळावे, स्त्रीयांना बाळंतपणाची रजा मिळावी, कामगार स्त्रियांच्या मुलांसाठी कामाच्या ठिकाणी पाळणाघरे असावी, स्त्रीयांना पुरुषाबरोबर मतदानाचा अधिकार असावा बाबासाहेबांनी असा सखोल विचार महिलाबाबत केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कायद्याच्या काही शाखाचे संहितीकरण व दुरुस्ती संबंधी समितीचा अहवाल भारतीय घटना समितीस सन १९४८ रोजी सादर केला. सदर अहवालात सात कायदे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदामंत्री असतांना आईला वडिलांच्या आधी उत्तराधिकारी बनविले 'दी हिंदू मॅरेज ॲक्ट' अन्वये द्विभार्या प्रतिबंध कायदा निर्माण झाला. या कायद्यामुळे स्त्रीयांना मिळणारी वाईट वागणुकीवर प्रतिबंध लागला आहे. महिलांचे जिवन सुरक्षित झाले आहे. पहिली पत्नी हयात असतांना दुसरी पत्नी करणे कायदेशीर गुन्हा ठरणार त्यामुळे तिच्या जिवनाला सुरक्षितता लाभली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या वारसा कायद्यामुळे महिलांना वारसा हक्क प्राप्त झाला. त्यामुळे तिची कुटूंबात पत वाढल्याने तीला सन्मान प्राप्त झाला आहे. तिचा आत्मसन्मान वाढला आणि स्वाभिमान जपला जात आहे. तिचे मनोबल वाढले आहे. याची झलक प्रत्येक क्षेत्रात दिसून येते. याचाच परिणाम म्हणून महिला प्रत्येक क्षेत्रात आग्रेसर बनल्या आहेत, राष्ट्रपती ते शिपाई झाल्या आहेत. म्हणून महिलांच्या उन्नतीसाठी सर्वांगीण विकास करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर खरे महिलांचे कैवारी ठरले आहेत.

अस्पृश्य समाजाला सामाजिक, धार्मीक, आर्थिक, शैक्षणिक जिवनात बहिष्कृत करण्यात आले होते. त्याच्या उध्दारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक लढे, आंदोलने केली आहेत. त्याच्या सोबत अंदोलनात सहभागी होणाऱ्या महिलांचे प्रमाण लक्षणीय होते. 'महाड चवदार तळ्याचा ऐतिहासीक सत्याग्रहात' महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. महाडला जी परिषद संपन्न झाली त्यामध्ये पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांनी सहभाग होता. बाबासाहेबांनी दिलेली शिकवण स्त्रियांनी अंगीकारली ही महाडच्या परिषदेची फार मोठी फलश्रुती होती. 'नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रहात मोठ्या संख्येने स्त्रियांनी सहभाग नोंदविला. तर २० जुलै १९४२ ला नागपूर या ठिकाणी महिला परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संबोधीत केले. या परिषदेसाठी २५ हजार महिलांनी सहभाग घेतला होता. अशा विविध आंदोलनात महिलांचा सहभाग हा लक्षणिय होता.

भारतीय महिलांना सामाजिक न्याय मिळावा. तसेच प्रत्येक क्षेत्रात महिलांना समान वागणुक मिळावी. ही बाबासाहेबांची तळमळ होती. कामगार मंत्री असतांना कामगार स्त्रियांना समान वेतन, कामाचे तास कमी, प्रसुती रजा, श्रम कागकारांना विशेष सुविधा, स्तनपान गृह इत्यादी महत्त्वाचे निर्णय बाबासाहेबांनी घेतले आहेत. पुरुषांच्या खांद्याला लावून चालणाऱ्या महिलांना सन्मान मिळाला पाहिजे. तशी बाबासाहेबांची विचारसरणी त्यांच्या कार्य-कर्तृत्वातुन दिसुन येते.

स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांच्या हक्कासंबंधी हिंदू कोडबील संबंधीत मसुदा सन १९४८ रोजी संसदेत मांडला गेला. भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांच्या जाचक, रूढी आणि परंपरापासुन सुटका मिळावी यासाठी हा मसुदा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ४ वर्ष १ महिना आणि २६ दिवस यावर काम करून हे हिंदू कोडबील तयार केले. सर्व जाती धर्माच्या स्त्रियांना समान न्याय हक्क मिळावा ही डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. त्यांनी आपल्या बिलामध्ये स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार, विधवा आणि मुलींना संपत्तीमध्ये अधिकार मृत्युपत्र बनविले नसेल तरीही त्या व्यक्तीच्या संपत्तीत हक्क मिळावा. स्त्री आणि पुरूषंना प्राप्त होणाऱ्या संपत्ती कायद्याने वाटणी झाली पाहिजे असा प्रस्ताव सादर केला होता.

भारतीय समाजात समता प्रस्थापित व्हावी, प्रत्येकाला न्याय मिळाला पाहिजे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विशेष तरतुद केलेल्या आहेत. महिलांना पुरूषासमान अधिकार मिळावे. कुटूंबात तीचा सन्मान व्हावा, तीला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असावे, तिला शिक्षण घेता यावे, संपत्ती विषयक अधिकार, अशा अनेक तरतुदी बाबासाहेबांनी राज्यघटनेत केल्या आहेत. अंधश्रध्दा, परंपरा ज्या स्त्रियांना गुलामीचे जिवन जगण्यास भाग पाडतात अशा कुप्रथेचे समुळ उच्चाटन त्यांनी कायद्याच्या माध्यमातुन केले आहे.

वरील माहितीचा सारांश घेवून कार्याचा निष्कर्ष मांडला आहे. स्त्रीयांच्या उध्दारांचा आढावा घेवून महामानव बाबासाहेबांच्या 'व्यक्तीमत्वाचा, कार्याचा व पैलुचा' आढावा घेवून त्यांची आंदोलने, त्यांची मंत्रीपदाची कामगीरी, राज्यघटनेतील त्यांचे कार्य कर्तृत्व आणि भारतीय महिलांच्या उन्नतीसाठी त्यांचे कार्य यावर लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. या निबंधाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन.... जयभीम.... जय संविधान...!



**- मुन्नाभाई अंजिरा रेवचंद नंदागवळी**

**गोंदिया, संवाद : ९७६४६७६४९९**

# केंद्रीय वित्त आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांचे ३८ व्या सेबी स्थापना दिन सोहळ्यात बीजभाषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांनी आज मुंबईत सेबी (भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळा) या शेअरबाजार नियामक संस्थेच्या ३८ व्या स्थापना दिन कार्यक्रमात प्रमुख भाषण केले.

याप्रसंगी सीतारामन यांनी सेबीचा देशव्यापी गुंतवणूकदार जागृती उपक्रम 'मिशन जागृत'चा डिजिटल पद्धतीने प्रारंभ देखील केला. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी आपल्या मुख्य भाषणात सेबीला उदयोन्मुख आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. यापैकी सर्वात गंभीर आव्हान सायबरसुरक्षेचे आहे, असे त्या म्हणाल्या. एखादा प्रमुख विनिमय बाजार, डिपॉझिटरी, क्लिअरिंग कॉर्पोरेशन किंवा मोठ्या ब्रोकरवर झालेला एक यशस्वी सायबरहल्ला राष्ट्रीय स्तरावर बाजारपेठा विस्कळीत करू शकतो, संपत्ती नष्ट करू शकतो तसेच यामुळे लोकांचा विश्वास इतका डगमगवू शकतो की तो पुन्हा मिळवण्यासाठी अनेक वर्षाचा काळ जावा लागेल, असा इशारा, सीतारामन यांनी दिला. कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित साधनांमुळे सायबरहल्ले अधिक वेगवान, तंत्रज्ञानाला अंगिकारणारे, विस्तारक्षम झाले असून काही प्रकरणांमध्ये तर त्यांची अंमलबजावणी अधिक स्वायत्त बनत आहेत. हे धोके अनेक रूपे घेऊ शकतात जसे की – प्रणालीतील त्रुटींचा स्वयंचलित शोध, सोर्स-कोडमध्ये हस्तक्षेप, सॉफ्टवेअर पुरवठा साखळीला लक्ष्य करणारे हल्ले आणि शोध टाळण्यासाठी रिअल-टाइममध्ये एकाच वेळी केलेली घुसखोरी. ''म्हणूनच, केवळ सेबीच नव्हे, तर सर्व नियामक संस्थांना अत्यंत सतर्क राहावे लागेल. हल्ल्याची साधने अतिशय वेगाने विकसित होत असल्याने संरक्षणाची साधने त्याहूनही वेगाने विकसित झाली पाहिजेत'', असे केंद्रीय अर्थमंत्री म्हणाल्या.

तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे समाज माध्यमावर बनावट गुंतवणूक व्हिडिओ आणि ॲप्सचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला असून, त्यापैकी अनेक जण नेत्यांचे बनावट रूप धारण करण्यासाठी डीपफेकचा वापर करत आहेत, असे केंद्रीय अर्थमंत्र्यांनी नमूद केले.

याच संदर्भात सेबीने एप्रिल २०२५ च्या आराखड्यानुसार सायबर सुरक्षा आणि विश्वासार्हते विषयी लक्षणीय काम केलेले आहे. हे कार्य एक मजबूत पाया असून त्यावर आधारित इतरही अनेक कामे करता येऊ शकतील, असे सीतारामन यांनी म्हटले.

सेबीच्या डाटा ॲनालेटिक्स आणि डिजिटल फोरेंसिक प्रयोगशाळेत, अत्याधुनिक कृत्रिम बुद्धीमत्ता आणि एमएल मॉडेलच्या माध्यमातून बाजारातील फसवणुकीची पद्धत आणि नेटवर्क वर आधारित फसवणुकीच्या प्रकारांचे विषण केले जात आहे, अशी माहिती त्यांनी दिली. सेबीने सुरु केलेल्या सेबी चेक चीही सीतारामन यांनी यावेळी प्रशंसा केली. या माध्यमातून गुंतवणूकदारांना आपले पैसे हस्तांतरीत करतांना नोंदणीकृत मध्यस्थांची पडताळणी करता येते. हा एक महत्वाचा प्रयोग असून तो तातडीने सर्वापर्यंत पोहोचेल अशा पद्धतीने त्याचा विकास केला पाहिजे असेही त्या म्हणाल्या. त्यांनी सेबीला जनजागृतीसाठी अधिकाधिक गुंतवणूक करण्याचा सल्लाही दिला. प्रादेशिक भाषांसह उपलब्ध असलेल्या सर्व प्लॅटफॉर्मवरुन ही जनजागृती झाली पाहिजे. सरकारी अधिकारी असल्याची बतावणी करुन करण्यात येणाऱ्या फसवणुकीवरही तातडीने कारवाई करण्याची प्रक्रियाही अधिक प्रभावी केली पाहिजे. असेही त्यांनी सांगितले.

सौम्य नियमन पद्धती आणि नागरिकांच्या सल्ल्याने आर्थिक क्षमता आणि प्रभावी प्रशासन वित्तीय कार्यक्षमतेसाठी आवश्यक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तपशीलवार नियमांच्या पुस्तकांऐवजी मूल्यांवर आधारित नियमनाला शक्य असेल तितके प्रोत्साहन दिले पाहिजे, असे सांगत, अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले की, २०२३ च्या अर्थसंकल्पात, नियमन प्रक्रियेमध्ये प्रशासकीय सुलभता आणि दर्जा वाढीसाठी नागरिकांशी सल्लामसलत करणेही महत्वाचे असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

असा सल्लामसलतीचा मार्ग निवडणे, जनतेच्या प्रतिक्रिया मागवणे त्याचप्रमाणे बाजारातील विविध समित्या आणि सहभागी लोकांबरोबर संपर्क साधल्याबद्दल सेबीचे कौतुक केले. ''आमचे गुंतवणूकदार जागतिक आहेत. आमचे समभाग जारी करणारेही, आंतरराष्ट्रीय भांडवलाचा वापर करतात, अशा वेळी, एखाद्या महत्वाच्या क्षेत्रात झालेल्या घडामोडींचा प्रभाव, साहजिकच त्या क्षेत्राच्या पलीकडेही होत असतो, त्यामुळे नियमनाबद्दलची चर्चा ही केवळ देशांतर्गत राहू शकत नाही.'' असे मत त्यांनी व्यक्त केले.

तक्रार निवारण यंत्रणा ही विश्वासार्ह, सहज उपलब्ध आणि निश्चित वेळेत प्रतिसाद देणारी असायला हवी, ही बाबही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी अधोरेखित केली. बाजारपेठेतील विश्वास हा केवळ परताव्यावर अवलंबून नसतो, तर तर तो चुकीच्या गोष्टींचे योग्य पद्धतीने निवारण केले जाईल याबद्दलच्या हमीवर अवलंबून असतो असे त्या म्हणाल्या. नोंदणी न केलेल्या फिन-फ्लुएन्सर्सवर सेबीने कारवाई केल्याबद्दल त्यांनी कौतुकही केले. या कारवाईतून विनापरवाना दिल्या जाणाऱ्या आर्थिक सल्ल्यांच्या घटनांकडे ही नियामक यंत्रणा किती गांभीर्याने लक्ष देत आहे हे दिसून येते असे त्या म्हणाल्या. ''आपल्याला जबाबदारीपूर्वक आर्थिक शिक्षण देण्याकरता उपयुक्त ठरेल अशा आराखड्याची गरज आहे, मात्र त्याचवेळी आपण वैयक्तिक फायद्यासाठी सामान्य गुंतवणूकदारांकडील माहितीच्या अभावाचा आणि त्यांच्या विश्वासाचा आर्थिक लाभ उठवण्यासारख्या बाबी सहन करायला नकोत,'' असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (घएइइअ ) आणि बाजारपेठेतील इतर संस्थांच्या सहकार्याने, दावा न केलेल्या आर्थिक मालमत्तांचे प्रमाण कमी करता यावे यासाठी तसेच त्याबद्दल जनजागृती निमर्ण करण्यासाठी राबवलेल्या, संयुक्त गुंतवणूकदार शिबिर कार्यक्रमांसाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सेबी आणि या



सर्व संस्थांची प्रशंसाही केली. यासोबतच, भारतीय रोखे बाजारपेठेमध्ये नो युवर कस्टमर अर्थात आपल्या ग्राहकांच्या ओळख पडताळणीच्या प्रक्रियेसाठी एकसमान निकष ठरवण्याकरता, तसेच या प्रक्रियेचे सुलभीकरण आणि डिजिटलायझेशन करण्याकरता सेबीने पुढाकार घ्यायला हवा असे आवाहनही केंद्रीय अर्थमंत्र्यांनी केले. या अनुषंगाने, आपल्या उपक्रमांमधील गुंतवणूकदारांचा मोठा सहभाग तसेच व्यापक डिजिटल पायाभूत सुविधा अशा जमेच्या बाजू सेबीकडे आहेत, यासोबतच इतर नियामकांमधील संस्थात्मक यंत्रणा म्हणून सेबीची मोठी विश्वासार्हताही आहे, या पार्श्वभूमीवर सेबी या जबाबदारीचे सक्षमतेने नेतृत्व करू शकते असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपुरातील विविध विकास कामाची आ. समाधान आवताडे, माजी आ. प्रशांत परिचारक यांनी केली पाहणी

## लवकरात लवकर आणि दर्जेदार काम करण्याच्या प्रशासनाला सूचना







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या नामसंकीर्तन सभागृह, राष्ट्रमाता जिजाऊ उद्यान तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारतीच्या कामाची शनिवारी आमदार समाधान आवताडे आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांना सोबत घेऊन संयुक्त पाहणी केली.

याप्रसंगी आमदार समाधान आवताडे यांनी कामाची सध्याची स्थिती जाणून घेऊ अपूर्ण असलेली कामे लवकरात लवकर आणि दर्जेदार करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच भाजपा व तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नगरसेवक तसेच संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी, पंढरपूर नगर परिषदेचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आमदार आवताडे म्हणाले की शहरातील नागरिकांच्या मागणीची दखल घेऊन वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करून उद्यानासाठी निधी उपलब्ध करून घेण्यात आला. जवळपास एक वर्षापासून जिजामाता उद्यानाचे काम सुरू होते. नागरिकांच्या मागणीनुसार लोकार्पण करण्यात आले. उद्घाटनादरम्यान काही काम अपूर्ण असल्याचे निदर्शनास आणून दिले गेले होते. त्यावेळेस कामाची पाहणी करून उद्यान चालू असताना काम पूर्ण करून घेऊ असे आश्वासन दिले होते. त्यानुसार संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन कामाची पाहणी करून अपूर्ण काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबत तात्काळ उपाय योजना न केल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल असा इशारा आमदार आवताडे यांनी यावेळी दिला.

याचबरोबर नामसंकीर्तन कीर्तन सभागृहाचे काम पूर्णत्वास आले असून आषाढी वारीच्या मुहूर्तावर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्याचा प्रयत्न असल्याचे आमदार अवताडे यांनी सांगितले.

---



# पंढरपूर अर्बन बँक कर्मचारी आता अर्थरक्षकबरोबरच जीवनरक्षक म्हणून कार्यरत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अर्थ कारणाबरोबर समाजकारणात अग्रेसर असणारी पंढरपूर अर्बन बँक कर्मचारी वर्गाला रोटरी क्लब ऑफ पंढरपूर यांचे वतीने आज बँकेचे कर्मयोगी सभागृह येथे आरोग्य जनजागृती उपक्रमांतर्गत उझठ (उरीवळेंर्शिोपरी ठशीीलळींरींळेप) या जीवनरक्षक तंत्रावरील देणेत आलेले मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी डॉ.नीरज दोडके व डॉ. वैभव सादिगले, तसेच बँकेचे संचालिका डॉ. संगीता पाटील यांनी हार्ट अटॅकसारख्या आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाला त्वरित मदत कशी करावी याबाबत सखोल माहिती दिली.

यावेळी बँकेचे संचालक हरिश ताठे, अमित मांगले, गणेश शिंगण, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे, व्यवस्थापक गणेश हरिदास व कर्मचारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बँकेचे कुटुंबप्रमुख श्री.प्रशांत परिचारक व चेअरमन श्री.सतीश मुळे यांनी रोटरी क्लब ऑफ पंढरपूर यांचे या स्तुत्य उपक्रमाबद्दल प्रशंसा केली.

कार्यक्रमादरम्यान कृत्रिम श्वास (ाशीीर्शि लीशरींहळपस) कसा द्यावा, तसेच हृदयावर किती प्रमाणात व कशा पद्धतीने

**रोटरी क्लब ऑफ पंढरपूरचा विशेष उपक्रम**

दाब (लहशीीं लोंर्शिाीळेपी) द्यावा याचे स्पष्ट मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अपघात किंवा अचानक बेशुद्ध पडलेल्या रुग्णामध्ये उझठ आवश्यक आहे की नाही हे कसे ओळखावे, याबाबतही विविध उदाहरणांसह माहिती देण्यात आली.

डॉ.दोडके यांनी ाीि द्वारे एखाद्या व्याख्यात्याप्रमाणे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे उझठ करण्याची योग्य पद्धत दाखवून उपस्थितांना प्रशिक्षण दिले, ज्यामुळे बँक कर्मचारी यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली. या उपक्रमामुळे बँकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याबाबत मोठ्या प्रमाणात जागरूकता निर्माण झाली.




याचबरोबर संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि दैनंदिन चालण्याचे महत्त्व यावरही त्यांनी विशेष मार्गदर्शन केले. निरोगी जीवनशैली अंगीकारणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमानिमित्त बँकेच्या माननीय संचालकांनी डॉक्टरांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना डॉ.दोडके यांनी दिलेली सविस्तर उत्तरे सर्वांसाठी मार्गदर्शक ठरली.

बँकेचे कर्मचारी भविष्यात अर्थरक्षक बरोबर जीवनरक्षक म्हणून कार्य करून अशी अपेक्षा रोटरी क्लब यांचे वतीने व्यक्त करणेत आली.

या कार्यक्रमास बँकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# पिक विमा प्रश्न पेटला - शासनाने दखल न घेतल्यास टप्प्याटप्प्याने तीव्र आंदोलनाचा इशारा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा, दि. २५ एप्रिल – शेतकरी योद्धा कृती समिती, बुलढाणा जिल्हा यांच्या वतीने आज पंचायत समिती सभागृह, सिंदखेडराजा येथे शेतकऱ्यांच्या पिक विमा प्रश्नासंदर्भात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत जिल्ह्यातील विविध भागातील शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **शेतकरी योद्धा कृती समितीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व कृषिमंत्री यांना तातडीने चर्चेसाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे. तसेच, शेतकऱ्यांनी एकजूट दाखवून या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहनही करण्यात आले.**
>
> **– शेतकरी योद्धा कृती समिती, बुलढाणा जिल्हा**


बैठकीत असे नमूद करण्यात आले की, खरीप २०२५ हंगामात सिंदखेडराजा, देऊळगाव राजा व लोणार तालुक्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात, जवळपास १०० टक्के नुकसान झाले असतानाही पिक विमा कंपनी व कृषी विभागाकडून नुकसान न झाल्याचे सांगत शेतकऱ्यांना विमा नाकारला जात आहे. या भूमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधितांना जाब विचारण्याचा निर्धार करण्यात आला.

याच पार्श्वभूमीवर दि. २९ एप्रिल रोजी अन्नत्याग आमरण उपोषण करण्याचा ठराव बैठकीत एकमताने मंजूर करण्यात आला. तसेच, १ मे महाराष्ट्र दिनी काळीगुडी उभारून सरकार व पिक विमा व्यवस्थेचा निषेध करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

बैठकीत पुढे असे ठरविण्यात आले की, शासनाने तात्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांशी चर्चा करून पिक विम्याचा प्रश्न सोडवावा. अन्यथा, येणाऱ्या काळात आंदोलन अधिक तीव्र करून टप्प्याटप्प्याने वेगवेगळ्या स्वरूपात पुढे नेण्यात येईल.

---

# अनधिकृत संगणक प्रमाणपत्रांपासून सावध राहा; पडघ्यात 'ओम शांती कॉम्प्युटर क्लासेस'चा विद्यार्थ्यांना सल्ला



## तंत्रज्ञान-सक्षम व पारदर्शक परीक्षा प्रणाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरात संगणक शिक्षणाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत असून, विद्यार्थ्यांनी योग्य आणि अधिकृत संस्थेची निवड करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. अनधिकृत संगणक क्लासेसकडून दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रांमुळे भविष्यात नोकरीच्या संधींवर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे विद्यार्थ्यांनी व पालकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे. पडघा येथील ओम शांती कॉम्प्युटर क्लासेस ही संस्था सरकारमान्य अभ्यासक्रम व प्रमाणपत्रे देणारी अधिकृत संस्था म्हणून पुढे येत आहे. या संस्थेत महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल) मान्यताप्राप्त कोर्सेस उपलब्ध असून, विद्यार्थ्यांना 'सरकारमान्य' सर्टिफिकेट्स दिली जातात. आजच्या स्पर्धात्मक युगात अशा प्रमाणपत्रांना मोठे महत्त्व असल्याने ते नोकरी मिळविण्यासाठी उपयुक्त ठरत आहेत. परिसरातील काही खाजगी संगणक क्लासेसमध्ये अधिकृत प्रमाणपत्रांची सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. याउलट, ओम शांती कॉम्प्युटर क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांना बेसिक संगणक ज्ञानासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), एमएस ऑफिस, इंटरनेट वापर, डिजिटल कौशल्ये तसेच ऑनलाईन व्यवहार यांचा समावेश आहे. संस्थेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनवणे आणि त्यांना रोजगारक्षम कौशल्ये प्रदान करणे हा आहे. अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन, प्रात्यक्षिक (प्रॅक्टिकल) प्रशिक्षण आणि सुसज्ज सुविधा यामुळे विद्यार्थी आत्मविश्वासाने पुढे जात असल्याचे सांगितले जाते.

पालकांनी आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी योग्य शिक्षणसंस्था निवडणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले आहे. सरकारमान्य प्रमाणपत्रे, आधुनिक अभ्यासक्रम आणि करिअरच्या संधी उपलब्ध करून देणारी ही संस्था पडघा परिसरात विश्वासार्ह पर्याय ठरत आहे. दरम्यान, संस्थेचे संचालक संजय पटेल यांनी विद्यार्थ्यांना विविध संगणक कोर्सेससाठी प्रवेश घेण्याचे आवाहन केले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी ८०८७३५५५५६ किंवा पूजा पवार (८९५६५८८६८१) या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# पुस्तकदिनानिमित्त प्रिसिजनतर्फे १५ ग्रंथपालांचा सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधत प्रिसिजन वाचन अभियानांतर्गत प्रिसिजन बुक क्लबतर्फे शहरातील १५ नामवंत ग्रंथपालांचा विशेष सन्मान करण्यात आला. रविवारी (दि. २६) खंदक बाग येथे आयोजित सोहळ्यात वाचन संस्कृती जपणाऱ्या या नायकांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. संध्या रघोजी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर बुक क्लबमधील वाचकांनी 'मला आवडलेले पुस्तक' या विषयावर मनोगत व्यक्त करत वाचनाचे अनुभव कथन केले. यावेळी ग्रंथपालांना देण्यात येणाऱ्या मानपत्राचे वाचन विकास धांडोरे यांनी केले.

प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे, नितीन फलटणकर, डॉ. संध्या रघोजी व श्रीधर खेडगीकर यांच्या हस्ते ग्रंथपालांचा सन्मान करण्यात आला. सन्मानित ग्रंथपालांच्या वतीने संतोष कुलकर्णी व मल्लेश पुरवंत यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रंथपालांना कौतुकाची सवय नसते, अशी मिश्कील टिप्पणी करत कुलकर्णी यांनी सन्मानाबद्दल आनंद व्यक्त केला.

माधव देशपांडे यांनी आपल्या बालपणीच्या आठवणी सांगत एका ग्रंथपालाने वाचनाची आवड कशी निर्माण केली, याचा अनुभव कथन केला. वाचक पुस्तकांपर्यंत पोहोचत नसतील, तर पुस्तकांनी वाचकांपर्यंत पोहोचले पाहिजे, असे ते म्हणाले.

वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी ग्रंथपालांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नितीन फलटणकर यांनी नमूद केले. आजची तरुण पिढी वाचन करत नाही हा गैरसमज आहे. पुणे पुस्तक महोत्सवात तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी महावीर लाळे यांनी आभार मानले. श्रीधर खेडगीकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या सन्मान सोहळ्याचे ग्रंथपालांनी विशेष कौतुक केले.

**यांचा झाला गौरव**

दत्तात्रय दगडू मोरे, अर्चना नितीन जावळे, मल्लेश विश्वनाथ पुरवंत, संतोष प्रकाश कुलकर्णी, मदन श्रीनिवास तोरवी, समर्थ दयानंद हब्बू, विजयालक्ष्मी नागनाथ क्षीरसागर, सविता शशिकांत मल्लाडे, महावीर विलासराव लाळे, लावण्या नरेंद्र यल्ला, ऋषिकेश विजय पाटील, अनंत भास्कर दिवाणजी, रमा मल्लिकार्जुन इप्पलपल्ली, परिणीता परेश नेसरीकर व अरिहंत रत्नपारखे.

# मंद्रूप येथील जबरी चोरीचा अवघ्या सहा तासात छडा

## पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : बुद्रुक येथे शुक्रवारी रात्री भेटलेल्या जबरी चोरीचा छडा लावण्यात मंद्रूप पोलिसांना यश मिळाले आहे. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या सहा तासात आरोपींचा शोध घेऊन त्यांच्या सिनेस्टाईल वाटला करून त्यांना बेड्या ठोकण्यात आले आहे. याबाबत माहिती अशी की, हुचपा उर्फ अण्णाप्पा कांबळे (वय ३६ राहणार कुरघट तालुका दक्षिण सोलापूर) ही आपली प्रेशर टेम्प( एम एच १३ बि.क्यू. ५५ ६८) मधून हा कर्नाटकातील इरकल इथून आपल्या आयशर टेम्पो मधून टोमॅटो म** भरून सोलापूर बाजार समितीकडे निघाले होते त्यांचे कोरफट येथे घर असल्याने घरी जाऊन ते मंद्रूप मार्गे सोलापूरला जात




होती त्यावेळी त्यांच्या टेम्पो मंद्रूप येथील श्री मुळशीदाप्पा मंदिर परिसरात आल्यावर तीन आरोपींनी कांबळे यांची गाडी जबरदस्त अडवून त्यांच्या जवळील वीस हजार रुपये जबरदस्तीने इस्कॉन घेतली आणि त्यांना मारहाणी केली. या घटनेची गंभीर दखल घेत मंद्रूप पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांनी तपासाची चक्री वेगाने फिरवली व गुन्ह्याच्या तपासासाठी त्यांनी पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, हवालदार बापू शिंदे मजेत शेख व संदीप काळे, शिवणे यांची पथक नेमले यावेळी पोलिसांनी तांत्रिक माहिती आणि सीसीटीव्ही फुटेज गोपनीय बातमीदाराच्या मदतीने आरोपींचा माग काढला व यावेळी आरोपींचा शनि स्टाईल पाठलाग करून दोन आरोपींना बेड्या ठोकल्या असून तिसऱ्या आरोपीचा शोध युद्धपाची सुरू आहे सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंद्रूप पोलीस ठाण्याची वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पटवारी पोलीस उपनिरीक्षक राज डांगे सहपोलीस कॉन्स्टेबल बापू शिंदे पोलीस कॉन्स्टेबल मज्जिद शेख संदीप काळे श्रीशैलेश शिवणे यांनी केले आहे.

# लोटसच्या विद्यार्थ्यांचा परदेशातील विद्यार्थ्यांसोबत 'इंग्लिश लर्निंग' प्रोग्रॅममध्ये सहभाग




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कासेगाव (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संचलित लोटस इंग्लिश स्कूलमध्ये 'इंग्लिश लर्निंग बडी प्रोग्रॅम' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन स्कूलच्या सभागृहात करण्यात आले आहे. दि. १९ एप्रिल पासून ते दि २१ जून २०२६ पर्यंत म्हणजे तब्बल १० आठवडे हा उपक्रम चालणार असून या उपक्रमात लोटसच्या विद्यार्थ्यांना अमेरिका व कॅनडा येथील विद्यार्थ्यांसोबत सहभागी होता येणार आहे. सदर उपक्रमाचे उदघाटन नुकतेच करण्यात आले.

संस्थेचे संस्थापक डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण क्षेत्रात विविध उपक्रम करून विद्यार्थ्यांना शिक्षणात गोडी निर्माण होत असते. त्याचाच एक भाग म्हणून लोटस इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषेतील प्रगती अधिक सुलभ आणि आनंददायी व्हावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दि. १९ एप्रिल पासून ते दि. २१ जून २०२६ पर्यंत हा कार्यक्रम चालणार आहे. प्रास्ताविकात प्राचार्या डॉ.जयश्री भोसले यांनी सांगितले की, 'हा उपक्रम सोबस इनसाइट फोरम (एसआयएफ) या संस्थेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला आहे. सोबस ही संस्था समाजविकास आणि सक्षमीकरणासाठी काम करणारी एक स्वयंसेवी संस्था (एनजीओ) आहे. सोबस इनसाइट फोरमचे दिग्विजय चौधरी यांनी स्थापन केलेली ही संस्था पंढरपूर मधील विविध प्रकल्पांवरही लक्ष केंद्रित करते. इंग्लिश बडी या प्रोग्रामची सुरुवात अर्जुन मल्होत्रा यांनी केली आहे जे भारतातील सर्वात मोठ्या माहिती तंत्रज्ञान कंपन्यापैकी एक असलेल्या एचसीएल चे माजी संस्थ्यापक आणि एसआयएफच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष आहेत. आजच्या जागतिक स्पर्धेच्या युगात इंग्रजी भाषेचे महत्त्व लक्षात घेऊन, विद्यार्थ्यांना घरापासूनच भाषेचा सराव मिळावा यासाठी पालकांचे सहकार्य मिळवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता. त्यामुळे वेगवेगळ्या संस्कृतीशी ओळख होते आणि भविष्यातील संधीसाठी आत्मविश्वास वाढतो'. या प्रसंगी शाळेच्या वतीने स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे डॉ.हर्षवर्धन रोंगे यांनी सविस्तर माहिती दिली. याबद्दल बोलताना त्यांनी आजच्या जागतिक स्पर्धेत इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे ही केवळ काळाची गरज नसून एक अनिवार्य कौशल्य झाले आहे असे सांगितले झाले आहे. हा शैक्षणिक उपक्रम हा १० आठवड्याचा आहे. यासाठी महाराष्ट्रातून २ शाळांची निवड करण्यात आली आहे. त्यातील कासेगाव मधील लोटस इंग्लिश स्कूल ही पहिली शाळा आहे. या उपक्रमासाठी अमेरिकेमधून २३ विद्यार्थी तर कॅनडामधून १७ विद्यार्थी लोटस इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. विद्यार्थी एकमेकांच्या सहाय्याने आणि पालकांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजीचे कौशल्य कसे वृद्धिंगत करू शकतील याचे यातून प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. स्कूलच्या प्राचार्या डॉ. जयश्री भोसले यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात पालकांची भूमिका किती महत्त्वाची आहे यावर बहुमोल मार्गदर्शन केले. 'इंग्लिश लर्निंग बडी प्रोग्राम' हा केवळ अभ्यासाचा भाग नसून विद्यार्थ्यांना एकमेकांच्या सोबतीने हसत खेळत जागतिक भाषेवर प्रभुत्व मिळवून देणारा एक प्रभावी मार्ग आहे. या कार्यक्रमावेळी संस्थेचे अध्यक्ष भीमराव रोंगे, शाळा व्यवस्थापन कमिटीचे सदस्य डॉ.महेश्वर गायकवाड, पालक प्रतिनिधी सौ.मनिषा अरकिले, शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षिका विभूती गवस यांनी केले. शाळेच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे पालकांकडून स्वागत केले जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला भविष्यात मोठी चालना मिळेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणी करिता उत्तम प्रकल्प संरचना तसेच अधिकाऱ्यांचे परफॉर्मन्स ऑडिट महत्त्वाचे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणी करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार समिती - पीएमसी द्वारे प्रकल्पाच्या टप्प्यांची सर्व स्तरावर देखरेख, वास्तुविशारदाद्वारे उत्तम प्रकल्प संरचना त्याचप्रमाणे खाजगी सहकारी सहभाग- पीपीपी( पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) आणि अधिकाऱ्यांचे परफॉर्मन्स ऑडिट हे महत्त्वाचं आहे असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर मध्ये केले. इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन- आयवा नागपूर शाखेतर्फे आज २४*७ वॉटर सप्लाय इंजीनियरिंग या डॉ. संजय दहासहस्र यांनी लिहिलेल्या पुस्तकाचं अनावरण गडकरी यांच्या हस्ते स्थानिक हॉटेल सेंटर पॉईंट येथील झाले त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी इंडियन वॉटर वर्क्सच्या राष्ट्रीय अध्यक्ष मनीषा पलांडे यांची उपस्थिती होती. पाणी व्यवस्थापनातील बारकावे हे या पुस्तकात असून

**केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन**

या पुस्तकातील संशोधन हे भविष्यातील यशकथा बनतील असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला. कुठल्याही प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन समिती ही प्रकल्पाच्या सुरुवातीपासून तर समाप्तीपर्यंतच्या सर्व प्रक्रियाबाबत जबाबदार असली पाहिजे असे सांगून गडकरींनी विस्तृत प्रकल्प अहवाल -डीपीआर हा कुठलीही निविदा काढण्यापूर्वी व्यवस्थित अभ्यासण्याचे आवाहन बांधकाम तसेच अभियांत्रिकी क्षेत्रातील अधिकाऱ्यांना केले . नागपूर येथे २४*७ पाणी हा प्रकल्प राबविण्यात आला असे देखील त्यांनी यावेळी नमूद केले . पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप मध्ये काम करून असे प्रकल्प मुद्रीकरणाद्वारे नफ्यात आणणे आवश्यक आहे . पाणी व्यवस्थापनामध्ये देखील ज्या छोट्या योजना आहेत त्यासाठी बेरोजगार सुशिक्षित अभियंतांना गुणवत्ता पूर्ण कामे करण्यासाठी काही प्रोत्साहन राशी देता येईल का याबद्दल देखील प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला जलव्यवस्थापन त्याचप्रमाणे जल अभियांत्रिकी क्षेत्रातील धोरणकर्ते, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच तज्ञ उपस्थित होते.

# येडोळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने भव्य मिरवनूक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड :भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्ताने तुळजापूर तालुक्यातील मौजे येडोळा येथे भव्य मिरवणूक काढण्यात आली.

येथील सिद्धार्थ कला व क्रीडा मंडळाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने दि.२५एप्रिल रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करून मोठ्या उत्साहाने व आनंदाने जयंती उत्सव साजरा करण्यात आला.या जयंती उत्सवाची भव्य मिरवणुकीने सांगता करण्यात आली.प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून सामुदायिक रित्या बुद्ध वंदना घेऊन तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांच्या भव्य मिरवणुकीला सह वाद्य फटाक्याची आतिषबाजी करत सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी डॉल्बीवर तरुणाई तिरकली. येथील भिमनगर येथून मुख्य रस्त्याने पाटील वस्ती, लोंढे वस्ती मार्गे माळावरील मुख्य चौकात ही मिरवणूक आली.या ठिकाणी अमरदीप लेझीम संघ नळदुर्ग, भिमशक्ती तरुण मित्र मंडळ काजीकणबस, डडङ्ग्रुप अष्टा कासार, भिमसेना लेझीम संघ नंदगाव, कमलशिल लेझीम संघ हगरगा नळ, प्रबुद्ध लेझीम संघ दस्तापूर, बि.एस, के. लेझीम संघ गुजनूर आदी लेझीम पथकाने आपले उत्कृष्ट लेझीम खेळाचे सादरीकरण केले.तर येथिल बालं भिम कन्या रनरागिनी स्नेहा महेश लोंढे यानी वैयक्तिक उत्कृष्ट नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली.

या प्रसंगी येथील समता सैनिक दलाचे वरिष्ठ पदाधिकारी मल्लिनाथ लोंढे व अनिल लोंढे यांचा माजी सरपंच पद्माकर पाटील यांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

या वेळी रवी पाटील, रिपाइं (आठवले) चे धाराशिव जिल्हा



सचिव एस.के. गायकवाड, तालुका संघटक सुरेश लोंढे, रामचंद्र लोंढे, रिपाइं शाखा अध्यक्ष देवानंद लोंढे, उपाध्यक्ष मारुती लोंढे, जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष भानुदास लोंढे, अर्जुन लोंढे, अंकुश लोंढे, लक्ष्मण लोंढे, प्रवीण कांबळे, अंबादास लोंढे, अमित लोंढे, डॉ.सुरज लोंढे, जेष्ठ कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी रमेश लोंढे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वागदरीचे अध्यक्ष महादेव वाघमारे, सचिव चंद्रकांत, उपाध्यक्ष दीपक वाघमारे, अनिल वाघमारे सह येडोळा, नळदुर्ग परिसरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमर जेटीथोर यांनी केले.




## भाजपा प्रदेश महिला मोर्चा अध्यक्ष आ. चित्रा वाघ यांचा निर्धार

# कितीही विरोध झाला तरी भाजपा महिलांना आरक्षण मिळवून देणारच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महिला आरक्षणाला विरोध करून लाखो महिलांच्या स्वप्नांचा चक्काचूर करणाऱ्या विरोधी पक्षांना या लाखो महिलांचा आक्रोश स्वस्थ बसू देणार नाही, अशी घणाघाती टीका करत कितीही विरोध झाला तरी महिलांना आरक्षण मिळवून देण्याचे लक्ष्य भाजपा गाठणारच, असा निर्धार भाजपा महिला प्रदेशाध्यक्षा आ. चित्रा वाघ यांनी शनिवारी व्यक्त केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. भाजपा प्रदेश सहमाध्यम प्रमुख ओमप्रकाश चौहान यावेळी उपस्थित होते.

आ. चित्रा वाघ यांनी सांगितले की, मागील तीस वर्षापासून ज्या ३३ टक्के महिला आरक्षणाच्या विधेयकाची आम्ही वाट पहात होतो ते काँग्रेस आणि विरोधकांमुळे फेटाळले गेले. राज्यातील उबाठा गट आणि शरद पवार यांची राष्ट्रवादीही त्यात सहभागी होते. महिला सक्षमीकरण आणि सशक्तीकरणाच्या गप्पा मारणाऱ्या, शाहू, फुले, डॉ. आंबेडकर यांची विचारधारा सांगणाऱ्यांनी खरोखरच देशातील महिलांना त्यांचे हक्क देण्याची वेळ आली तेव्हा मात्र आपला हात आखडता घेतला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे महिला सक्षमीकरण आणि सशक्तीकरणाची सुरुवात झाली होती. महिलांना मतदानाचा अधिकार देत त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी केले. गेले दशकभर यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी महिलांना सशक्त करण्यासाठी काम करत आहेत. महिलांसाठी त्यांनी अनेकविध योजना



आणल्या. आता नारी शक्ती वंदन विधेयकाद्वारे संसदेत, प्रत्येक राज्याच्या विधानसभेत ३३ टक्के महिलांचा आवाज घुमणार होता. मात्र या विधेयकाला विरोध करत महिलांना पायदळी तुडवण्याचे काम केले गेले. लोकप्रतिनिधीपदापर्यंत पोहोचण्यासाठी सर्वसाधारण घरातील मुली परिश्रम करतात. पण यांना सर्वसाधारण घरातील मुली मुख्य प्रवाहात आलेल्या विरोधकांना नको आहेत. आपल्याच लेकी सुनांना आणून यांना त्यांचीच मक्तेदारी चालवायची आहे. विरोधकांच्या या विरोधामुळे त्यांचा बुरखा टराटरा फाटला आहे, अशी घणाघाती टीकाही आ. चित्रा वाघ यांनी केली.

भाजपा महिलांचा गैरवापर करत आहे, या प्रियांका गांधी यांच्या आरोपाचा खरपूस समाचार घेत आ. चित्रा वाघ म्हणाल्या की, वापर करण्यासाठी महिला या काही वस्तू नाहीत. भाजपात महिलांवर अन्याय केला जात नाही तर भाजपा कायम महिलांचा सन्मानच करते. भाजपाने काढलेल्या मोर्चाच्या निमित्ताने लाखो महिलांचा आवाज तुमच्या कानापर्यंत गेला नाही हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. मात्र लाखो महिलांना अधिकार आणि हक्क मिळवून देण्याचे आमचे जे मुख्य ध्येय आहे त्यापासून आम्ही किंचितही ढळणार नाही. आमचा आवाज दिवसेंदिवस बुलंद होत जाईल आणि येत्या काळात देशाचे सर्वोच्च सभागृह संसद आणि प्रत्येक राज्यातील विधानसभेत सर्वसामान्य महिला प्रतिनिधित्व करताना दिसतील असे आ. चित्रा वाघ यांनी नमूद केले.

लैंगिक शोषणाचे प्रकार पुढे येत असल्याबद्दल त्या म्हणाल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा यांच्यावर विश्वास असल्यानेच मुली अशा प्रकरणात तक्रार करण्यासाठी पुढे येत आहेत. याचप्रमाणे दबाव झुगारून त्यांनी निडरपणे तक्रारी करण्यासाठी पुढे यावे. कोणत्याही दोषी व्यक्तीला सोडण्यात येणार नाही, दोषींवर कठोर कारवाई होईल, याची खात्री महिलांनी बाळगावी, असे आ. चित्रा वाघ यांनी सांगितले.

# विठ्ठल अभियांत्रिकीत राज्यातील पहिले नीती सेंटर मंजूर; दोन मे रोजी होणार उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : केंद्र सरकारने स्टार्ट ऑफ इंडियाच्या माध्यमातून ग्रामीण भागात उद्योजक तयार व्हावेत तसेच नवतंत्र्याचा वापर व्हावा याकडे लक्ष केंद्रित केले आहे. त्या पार्श्वभूमीवर पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर येथील विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयात राज्यातील पहिले नीती सेंटर होणार असून. याचे उद्घाटन दोन मे रोजी करण्यात येणार आहे.

ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची गंगा पोहोचवावी डॉक्टर, इंजिनीयर वकील, यासाठी प्राचार्य डॉक्टर बी.पी .रोंगे, डॉक्टर प्रशांत पवार, एम. एस. पवार यांनी विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालय मधून शिक्षण देण्यात सुरू केले आहे.

सध्या विठ्ठल जयंती महाविद्यालयाने हजारो अभिनेते घडवले आहेत विठ्ठल अभियांत्रिक मध्ये चांगल्या प्रकारचे शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या नीती आयोग स्टार्ट ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने नवा उद्योजक तयार व्हावा व ग्रामीण दहापर्यंत नवीन तंत्रज्ञान जावे. यासाठी विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालय नीती सेंटर सुरू करण्यात आलेले घेतला आहे. या सेंटरचे उद्घाटन दोन मे रोजी होणार असून ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर अनिल काकोडकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या सेंटरचा ग्रामीण भागातील नव उद्योजकांना याचा फायदा होणार आहे.

यासाठी केंद्र सरकारकडून या अभियांत्रिकी महाविद्यालयातील साठी संशोधनासाठी निधी मिळालेला होता. या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास होईल. ग्रामीण भागातील इंटरनेट द्वारे शिक्षण देण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे.